


# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे



✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - २ रे. ✻ अंक १७६ वा. ✻ शुक्रवार दि.०९ जानेवारी २०२६ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 176 ✻ Friday 09 January 2026 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

## सातारा-जावलीतील रस्ते विकासकामांसाठी ९० कोटी

### ना.शिवेंद्रसिंहराजेंचा पाठपुरावा; ८ कामांसाठी नाबार्डमधून निधी मंजूर

सातारा-राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या माध्यमातून सातारा जिल्ह्यातील रस्ते विकासकामांसाठी भरीव निधी उपलब्ध होत असून अनेक विकासकामे मार्गी लागत आहेत. ना. शिवेंद्रसिंहराजेंच्या पाठपुराव्यातून आता सातारा- जावली तालुक्यातील रस्ते विकासाच्या विविध ८ कामांसाठी तब्बल ९० कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे.

ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी सुचवलेल्या कामना शासनाच्या नाबार्ड योजनेतून हा निधी मंजूर झाला आहे. जावली तालुक्यातील वारणेवस्ती, गाढवली, कुरळोशी, केळघर, डांगरेघर, आखेगणी, धावली, मेमाणेवस्ती, सुलेवाडी, सायघर रस्ता भाग केळघर ते धावली या अतिवृष्टीने क्षतिग्रस्त झालेल्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी १८ कोटी ९० लाख रुपये, सर्जापूर ते कळंबे रस्त्यावरील पुलाचे जोड रस्त्यासह बांधकाम करण्यासाठी ६ कोटी, प्रजिमा २५ कुडाळ ते पानस रस्ता ग्रा.मा. ८९ मध्ये कुडाळी नदीवर मोठ्या पुलाचे जोडरस्त्यासह बांधकाम करण्यासाठी ५ कोटी रुपये निधी उपलब्ध झाला आहे.



सातारा तालुक्यातील लिंबखिंड-खिंडवाडी रस्ता प्रजिमा ३० मध्ये वर्ये गावाजवळ वेण्णा नदीवर पोहोच मार्गासह मोठ्या पुलाचे बांधकाम करण्यासाठी २३ कोटी ५० लाख रुपये, राज्य महामार्ग ४ ते म्हसवे, करंजे, मोळाचा ओढा शाहूपुरी पोलीस ठाणे मतकर कॉलनी, शाहूपुरी चौक, ते जुना मेढा रस्ता ते सारखळ रस्त्यावर म्हसवे गावाजवळ वेण्णा नदीवर मोठ्या पुलाचे पोहोच मार्गासह बांधकाम करण्यासाठी १८ कोटी, रा.म. ४ ते माजगाव, अंबेवाडी जोडरस्त्यावर माजगाव गावाजवळ उरमोडी नदीवर पोहोच मार्गासह मोठ्या पुलाचे बांधकाम करणे ८ कोटी, खालची जगमीन, वरची जगमीन रस्ता ग्रा.,मा. १२४ मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणेसाठी ५ कोटी, पांगारे,पळसावडे, सांडवली, इ.जि.मा. ६१ (केळवली) रस्ता ग्रा.मा. १२३ येथे काँक्रीट रस्त्याचे बांधकाम व पुलाचे बांधकाम करणेसाठी ५ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे.

मंजूर कामांची निविदा प्रक्रिया व इतर शासकीय सोपस्कार तातडीने पूर्ण करा. कामे दर्जेदार करून वेळेत पूर्ण करा, अशा सूचना ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या आहेत.

## रशियाकडून तेल खरेदी केल्यास ५०० टक्के कर?

वॉशिंग्टन : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आता आणखी एक मोठा निर्णय घेत द्विपक्षीय निर्बंध विधेयकाचा मार्ग मोकळा केला आहे. या विधेयकात भारतासह रशियासोबत व्यापार सुरू ठेवणाऱ्या देशांवर ५०० टक्के प्रचंड टॅरिफ लादण्याचा प्रस्ताव आहे. ट्रम्प यांनी अशा प्रकारचा कर लादण्याचा थेट इशारा दिला आहे.रशियाकडून थेट कच्चे तेल खरेदी करणाऱ्या देशांवर ट्रम्प यांनी लगाम खेचण्याचा नव्याने प्रयत्न सुरू केला आहे. यामुळे एक प्रकारे रशियाला आर्थिक रसद पोहोचवत असल्याचा ट्रम्प यांचा आरोप आहे. या कारणावरून भारत, चीन आणि ब्राझील हे देश अमेरिकेच्या हिटलिस्टवर आहेत. यासंदर्भात अमेरिकेत द्विपक्षीय विधेयक मंजूर झाले आहे. याचा वापर भारत, चीन आणि ब्राझीलवर दबाव आणण्यासाठी केला जाण्याची शक्यता आहे. या नव्या विधेयकामुळे भारतासह रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर तब्बल ५०० टक्के कर लादण्यात येणार आहे. याचा फटका भारतीय व्यापाऱ्यांना बसू शकतो. त्यामुळे आज भारतातील वस्त्र आणि कोळंबीशी संबंधित कंपनीचे शेअर्स कोसळले.



अमेरिकेत मंजूर झालेल्या नव्या विधेयकानुसार या देशांना दंडित करण्यात येणार आहे. युक्रेन युद्ध थांबविण्यासाठी आता या देशांवर भारी भक्कम दंड आकारण्यात येणार आहे. ग्राहम यांनी संकेत दिले की, पुढील आठवड्याच्या सुरुवातीला हे विधेयक मंजूर होणार आहे. त्यासाठी मतदान होईल. ट्रम्प यांनी रशियावरील प्रतिबंध विधेयकाला मंजुरी दिली. सीनेटर ब्लूमॅथल आणि इतर काही सीनेटरसह आपण गेल्या ६ महिन्यांपासून या विधेयकावर काम करत असल्याचा दावा ग्राहम यांनी केला. युक्रेन शांतता करारासाठी पुढे आलेला असतानाही रशिया लष्करी कारवाई काही केल्या थांबत नसल्यावर ग्राहम यांनी चिंता व्यक्त केली. ज्या देशांमुळे रशियाला मोठी आर्थिक रसद पोहोचत आहे, त्यांना दंडित करण्याची वेळ आल्याचे ग्राहम यांनी स्पष्ट केले. हे देश रशियाकडून स्वस्तात इंधन खरेदी करत असले तरी त्याचा रशियाला फायदा होत आहे. त्यामुळे भारत, चीन आणि ब्राझील यां देशांवर अत्याधिक दबाव आणण्याचा हा प्रयत्न आहे. त्यासाठी हे विधेयक सभागृहासमोर मतदानासाठी मांडण्यात येईल, असे ग्राहम यांनी स्पष्ट केले.या विधेयकाचा मथळा रशियावर प्रतिबंध अधिनियम २०२५ असा आहे. यामध्ये रशियाला मदत करणाऱ्या संस्था, देश, व्यक्तींना दंडित करण्यात येणार आहे. त्यासाठी व्यापक दंडात्मक उपाय करण्यात येतील. या विधेयकात रशियातून संयुक्त राज्य अमेरिकेत आयात होणाऱ्या सर्व वस्तूंच्या किंमतीवर ५०० टक्के कर आकारण्याचा प्रस्ताव आहे.

**ट्रम्प यांचा भारताला इशारा**

रशियाकडून भारत तेल खरेदी करत असल्याने अमेरिकेने भारतीय वस्तूंवर टॅरिफ लावले आहे. त्यामुळे भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी नाराज आहेत. हाऊस रिपब्लिकन पार्टीच्या सदस्यांच्या बैठकीत बोलताना ट्रम्प म्हणाले की असे असले तरी मोदींशी आपले संबंध अजूनही चांगले आहेत. टॅरिफच्या मुद्यावर तणाव सुरु असल्याचे ट्रम्प यांनी मान्य केले. पण जर अमेरिकेच्या भूमिकेशी विसंगत भूमिका भारताने घेतली तर टॅरिफ वाढवण्यात येईल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी द्विपक्षीय निर्बंध विधेयकाचा मार्ग मोकळा केल्यानंतर ८ जानेवारी रोजी वस्त्र आणि कोळंबी निर्यात करणाऱ्या कंपन्यांच्या शेअर्सना मोठा फटका बसला आहे. या विधेयकात भारतासह रशियासोबत व्यापार सुरू ठेवणाऱ्या देशांवर ५०० टक्के टॅरिफ लादण्याचा प्रस्ताव आहे. कोळंबी निर्यात करणाऱ्या एपेक्स फ्रोझन फूडस्च्या शेअर्समध्ये ६ टक्के घसरण, अवंती फीडस्च्या शेअर्समध्ये ७ टक्के घसरण झाली आहे.

## भाजपच्या गटनेते पदी विजय वाटेगावकर यांची निवड

कराड : कराड नगरपालिकेतील भाजपचे नवनिर्वाचित नगरसेवक विजय वाटेगावकर यांची भाजपच्या नगरपरिषद गट पक्षनेते पदी निवड करण्यात आली आहे. ते विरोधी पक्ष नेते म्हणून काम पाहणार आहेत. आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या सूचनेनुसार भाजप कराड नगरपरिषद गट पक्षाच्या सर्व नेत्यांची आणि कराड नगरपरिषदेतील भाजपच्या सर्व निर्वाचित नगरसेवकांची बैठक झाली.

यात नगरसेवक विजय पांडुरंग वाटेगावकर यांची कराड नगरपरिषदेत भाजप गटाच्या सभागृहातील पक्ष नेतेपदी एकमुखाने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या गैरहजेरीत नगरसेवक शिवाजी पांडूरंग पवार हे काम पाहतील, असा निर्णय घेण्यात आला. याबाबतचे पत्र भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार डॉ. अतुलबाबा भोसले



यांनी जिल्हाधिकारी संतोष पाटील यांना दिले आहे. तसेच मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांना देण्यात आले.

नगरसेवक शिवाजी पवार यांची पक्षप्रतोद पदी निवड करण्यात आली आहे. तसेच व्हीप बजावण्याचे अधिकारही त्यांना देण्यात आले आहेत.

विजय वाटेगावकर यांनी २००६ पासून पालिकेत नगरसेवक म्हणून काम पाहिले आहे. सलग तीन निवडणुकीत ते नगरसेवक आहेत. आरोग्य समितीचे सभापती म्हणून त्यांनी

**शिवाजी पवार पक्षप्रतोद**

उल्लेखनीय काम केले आहे. पालिकेच्या कामकाजाचा त्यांना मोठा अनुभव आहे. भाजप नगरसेवकांमध्ये सर्वात अनुभवी असल्याने त्यांची सभागृह गटनेते पदी निवड करण्यात आली आहे. दरम्यान भाजपचे गटनेते व दहा सदस्यांची फ्लोअर टेस्ट आणि नोंदणी करण्यात आली. यावेळी नगरसेवक विजय वाटेगावकर, शिवाजी पवार, अजय पावसकर, आशुतोष डुबल, गणेश पवार, सुमित जाधव, नगरसेविका किशोरी शिंदे, वैष्णवी वायदंडे, शारदा माने, वर्षा वास्के आदी उपस्थित होते.

## कायदा हा लोकशाहीचा कणा असून युवक हे कायद्याचे दूत आहेत-न्यायाधीश प्रशांत पेठकर

सोलापूर : आजच्या युवकांच्या हाती उद्याच्या भारताचे भवितव्य असून हे युवक समाजात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, समाजातील गुन्हेगारी प्रवृत्ती कमी करण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडू शकतात.

कायदा हा लोकशाहीचा कणा असून आजच्या युवकांनी कायदे दूत म्हणून भूमिका बजावावी, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रशांत पेठकर यांनी केले

युवा दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा हे होते.

या प्रसंगी व्यासपीठावर सचिव तथा न्यायाधीश प्रशांत पेठकर, लोक अभीरक्षक शिवकैलास झुरळे, सामाजिक कार्यकर्त्यां ॲड. सरोजिनी तमशेट्टी, पोलीस हेड कॉस्टेबल अंजली काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने आयोजित निबंध स्पर्धेत गायत्री मेट्रे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला, द्वितीय क्रमांक अक्षता शिवशरण, तृतीय क्रमांक समीक्षा थोरा, उतेजनार्थ सानिया नायडू व कर्तव्या बालसराफ यांनी पटकविले. विजेत्यांना प्रशस्तीपत्र व पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

प्राचार्य डॉ ऋतुराज बुवा यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर हे तरुणांचे भान जपण्यासाठी व जबाबदार युवक घडण्यासाठी महत्वाची भूमिका बजावेल असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक ॲड. शिवकैलास झुरळे यांनी केले, सूत्रसंचालन बसवराज हगरगुंडगी यांनी केले.

## शेतीपंपांसाठी दिवसा विद्युत पुरवठा सुरु होणार

### आ.डॉ.अतुलबाबा भोसले यांच्या हस्ते शुभारंभ

कराड : शेतकऱ्यांच्या दीर्घकाळच्या मागणीला दिलासा देणारा निर्णय अखेर प्रत्यक्षात येत असून, शेतीपंपांसाठी दिवसा विद्युत पुरवठा सुरु करण्याच्या कामाचा शुभारंभ शुक्रवारी (दि. ९) सकाळी ११ वाजता काले सबस्टेशन येथे होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन आ. डॉ. अतुलबाबा भोसले (जिल्हाध्यक्ष, भाजपा, सातारा) यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

आ.डॉ.अतुल भोसले यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे हा उपक्रम मार्गी लागला आहे. रात्रीच्या वेळी शेतीसाठी वीज वापरावी लागल्याने शेतकऱ्यांना होणारा त्रास, अपघातांची शक्यता आणि अतिरिक्त खर्च यामध्ये या निर्णयामुळे मोठी घट होणार आहे. दिवसा वीज उपलब्ध झाल्याने



शेतीकाम अधिक सुरक्षित व सुलभ होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

या योजनेचा लाभ काळे, नांदगाव, कोडोली व रेठरे खुर्द या फिडरअंतर्गत येणाऱ्या अनेक गावांना होणार आहे. काले फिडरवरील काले, नारायणवाडी, कालेटेक, आटके; नांदगाव फिडरवरील संजयनगर, चौगुले मळा, भैरवनाथनगर, धोंडेवाडी; कोडोली फिडरवरील कापील, जखिणवाडी, नांदलापूर तसेच रेठरे खुर्द फिडरवरील वाठार व मालखेड या गावांतील शेतकऱ्यांना या निर्णयाचा थेट फायदा होणार आहे.

## भाजपची अवस्था पिंजरा चित्रपटातील मास्तरासारखी

सांगली : आज भाजप पक्षाची अवस्था पिंजरा चित्रपटातील मास्तराप्रमाणे झाली आहे. या चित्रपटात मास्तराला तमाशाचा इतका नाद लागला की मास्तरच तुणतुणे हातात घेऊन पुढे उभा राहायला लागला अशी जहरी टीका शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार जयंत पाटील यांनी केली. 'ये बंद करने आए थे तवायफोके कोठे, मगर सिक्को की खणक सुनकर खुद ही मुजरा कर बैठे', अशा शेरोशायरीतून जयंत पाटील यांनी भाजपला टोला लगावला. सांगली महापालिकेच्या प्रचारसभेत बोलत असताना जयंत पाटील यांनी भाजपवर जोरदार टीका केली.

जयंत पाटील म्हणाले की, भाजपाचे ज्येष्ठ नेते स्वर्गवासी अटल बिहारी वाजपेयी यांनी वेगवेगळ्या आघाड्या एकत्र करुन सत्ता बनवण्याचे नाकारल्याचे उदाहरण आहे. मात्र आज भाजप काय करतेय? सगळे काँग्रेसमधील ओढून भाजपमध्ये नेले आहेत. आता आपले गडी देखील तिथे चाललेत. काँग्रेस सर्व धर्मभावाचा विचार घेऊन चालते म्हणून तुम्ही साथ दिली. काँग्रेस सोडून जातीयवादी झेंडा घेण्यापूर्वी त्या व्यक्तीने दहा वेळा विचार करायला पाहिजे. मात्र दुर्दैवाने ती परिस्थिती नाही.

जयंत पाटील म्हणाले की, भाजपवाले सांगतात की ते हिंदुत्ववादी आहेत आणि अकोल्यात एमआयएम सोबत युती करतात. ओवैसींच्या मांडीला मांडी लावून बसतात. यांचे दाखवायचे दात वेगळे आहेत, हे लक्षात घ्या. सत्तेसाठी कुणाशीही आघाडी करायला यांना काही वाटत नाही. काँग्रेसमुक्त भारत करायला निघालेला भाजप आता काँग्रेसयुक्त झाला आहे. व्यक्तीला मतदान करा. साध्या मनाची, सुशिक्षित उमेदवार आम्ही दिले आहेत. ज्यांनी पक्ष बदलले त्यांना हिसका दाखवा. विचाराच्या मागे सांगली राहते हे दाखविण्याची हीच वेळ आहे असं आवाहन जयंत पाटील यांनी केले.

### डॉ.माधवराव गाडगीळ यांच्या निधनाबद्दल राज्यपालांना दुःख

महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी पर्यावरण तज्ज्ञ डॉ माधवराव गाडगीळ यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पर्यावरण तज्ज्ञ डॉ माधवराव गाडगीळ यांच्या निधनाचे वृत्त समजून दुःख झाले. पर्यावरण संतुलन, संरक्षण व जैवविविधतेचे जतन या कार्यासाठी आयुष्य वेचलेले डॉ गाडगीळ हे आधुनिक काळातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व होते. आज जगात पर्यावरणाचा ऱ्हास होत असताना त्यांनी सातत्याने विद्यार्थी, युवक तसेच इतर सर्व वर्गामध्ये पर्यावरण रक्षणाबाबत जनजागृती केली. त्यांचे कार्य पुढे नेणे हीच त्यांना सच्ची आदरांजली ठरेल, असे राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशामध्ये म्हटले आहे.

## कराड तहसील कार्यालयात सैनिक दरबार बैठक संपन्न

कराड : कराड तहसील कार्यालयात तालुका स्तरावर सैनिक दरबार बैठक संपन्न झाली. या बैठकीत आजी/माजी सैनिक, शहीद जवानांचे कुटुंबीय, तसेच महसूल, पोलिस, ग्रामविकास, वन, भूमी अभिलेख, नगर विकास, बांधकाम, कृषी अशा सर्व शासकीय विभागांचे अधिकारी सहभागी झाले.



कर्नल सतेश हंगे, उपसंचालक सैनिक कल्याण विभाग पुणे, तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सातारा होते. तसेच निवासी नायब तहसीलदार श्री बाबुराव राठोड, नायब तहसीलदार श्री महेश उबारे आणि गटविकास अधिकारी श्री प्रताप पाटील उपस्थित होते.

य कर्नल सतेश हंगे यांचे तहसील कार्यालय आणि अमृतवीर जवान अभियान समिती व सैनिक कक्ष यांच्या वतीने निवासी नायब तहसीलदार श्री बाबुराव राठोड यांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन सन्मान करण्यात आला. बैठकीत सैनिक कल्याण विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली, तर नायब तहसीलदार व गटविकास अधिकारी यांनी मार्गदर्शन केले. ज्या विभागातील समस्या असतील त्या तत्काळ सोडवण्याचे आश्वासन दिले. या बैठकीत ७० तक्रारी अर्ज प्राप्त झाले आणि सर्वांचा तत्काळ निपटारा करण्यात आला.

याशिवाय, भारतीय सैन्य दलातून सेवानिवृत्त नि. सुभेदार धनंजय यादव यांचा सन्मान कर्नल सतेश हंगे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक माजी सैनिक श्री प्रशांत कदम यांनी केले, तर आभार नि. सुभेदार मेजर राजाराम माळी यांनी मानले.

## संपादकीय....

# सुरक्षेच्या दृष्टिने धोका!

अमेरिकेची प्रतिष्ठा जगात पुन्हा प्रस्थापित करण्याचा शब्द अमेरिकनांना देऊन निवडून आलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांची पावलं प्रत्यक्षात भलतीकडेच पडू लागली आहेत. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला त्यांच्याच घरातून शिताफीने उचलून जेरबंद केल्यापासून ट्रम्प यांचा वाह्यात आत्मविश्वास भलताच वाढला आहे. आपल्या एकाच वक्तव्यात परवा त्यांनी निम्म्या जगाला धमकावलं; त्यात भारताचाही समावेश केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी एक वाक्य चांगलं बोलताना त्यांनी पुढे जी मुक्ताफळं उधळली, ती भारताच्या प्रतिष्ठेला आव्हान देणारी आहेत. ’ट्रम्प यांना खूश ठेवणं आवश्यक आहे, हे मोदी चांगलं जाणतात’ असं म्हणताना ट्रम्प यांनी पुढे रशियाकडून घेतलं जाणारं कच्चं तेल पूर्णपणे थांबवलं नाही, तर भारतावर आणखी कितीतरी पट आयात कर लादू, अशी धमकी दिली आहे. ट्रम्प आणि मोदी हे दोघेही दोन सार्वभौम राष्ट्रांचे प्रमुख आहेत. त्यांच्यातील संबंधांचे मुख्य कारणही तेच आहे. त्यामुळे, जे अत्यंत जबाबदारीचे संबंध आहेत, त्या संबंधांबद्दल बोलताना ट्रम्प यांनी त्यात ज्या प्रकारे दोन देशांची प्रतिष्ठा गुंफली, ते अत्यंत निषेधार्ह आहे. अर्थात ट्रम्प यांना अशा गोष्टींचा विधीनिषेध नाही. ते तो पाळत नाहीत, हे त्यांच्या यापूर्वीच्या असंख्य विधानांवरून (आणि वर्तणुकीतूनही) सिद्ध झालं आहेच. भारत आणि पाकिस्तानमधला ’ऑपरेशन सिंदूर’वेळचा तणाव निवळवण्याचं श्रेय भारताने आपल्याला द्यावं, यासाठी त्यांनी यापूर्वी केलेले जाहीर प्रयत्न आणि विधानं म्हणजे बालिशपणाचा नमुना होता. मोदी यांनी अत्यंत परिपक्वपणे, मौन पाळून त्याला जो प्रतिसाद दिला, तो लाजवाब होता. यावेळीही तसंच घडेल, यात शंका नाही. प्रश्न अन्य देशांचा आहे. भारताने आपल्या ’हो’त ’हो’ मिसळावं यासाठी ट्रम्प यांनी भारत आणि अमेरिकेतली व्यापारी बोलणी रोखून ठेवली आहेत, हे न कळण्याएवढा भारत दुधखुळा नाही. पाकिस्तानचे लष्करप्रमुख असिम मुनीर यांनी आपल्या देशातल्या मौल्यवान खाणी ट्रम्प यांच्या हवाली करून त्यांची मर्जी संपादन केली. तशी गरज ना भारताला आहे, ना मोदींना. ट्रम्प यांना जितक्या लवकर हे समजेल, तेवढं ते त्यांच्याच हिताचं असेल!

मादुरो यांना जेरबंद केल्यानंतर ट्रम्प यांनी इराण, लॅटिन अमेरिकन देशांसह युरोपलाही एका फटक्यात धमकावलं. डेन्मार्कच्या अखत्यारीत; पण स्वतंत्र अस्तित्व असलेल्या ग्रीनलँडचा ताबा ट्रम्पना हवा आहे. निवडून आल्या आल्या त्यांनी आपला हा मनसुबा जाहीर केला होता. तोच परवा पुन्हा अधिक आग्रहपूर्वक केला. त्याला डेन्मार्कचे पंतप्रधान मेट्टे फ्रेडरिक्सन आणि ग्रीनलँडचे पंतप्रधान जेम्स फ्रेडरीक नेल्सन या दोघांनीही कडक शब्दांत उत्तर दिलं. वास्तविक डेन्मार्क नाटो देशांचा भाग असल्याने त्याच्या संरक्षणाची जबाबदारी अमेरिकेचीच आहे. करारानुसार ज्याच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे, त्याचाच घास घेण्याची ही अजब आंतरराष्ट्रीय नीती आहे! ट्रम्प यांच्या या धोरणाविरोधात त्यामुळेच नार्डिक, बाल्टिक देशांसह पूर्ण युरोपातून तत्काळ निषेधाचे सूर उमटले आहेत. ग्रीनलँड हे आर्क्टिक महासागरातलं सर्वात मोठं बेट. ते खनिज संपत्तीने समृद्ध असल्याने ट्रम्प यांचा त्यावर डोळा असणं स्वाभाविक आहे. पण, त्याशिवाय ग्रीनलँड हे सुरक्षेच्या दृष्टीनेही अमेरिकेला महत्त्वाचं आहे. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने डेन्मार्कवर आक्रमण केल्या केल्या अमेरिकेने ग्रीनलँडवर चढाई करून ते ताब्यात घेतलं होतं. युद्धानंतरही बराच काळ अमेरिकन सैन्य तिथे होतं. तिथलं पिटूफ्फीक विमानतळाचं संचलन आजही अमेरिकेकडेच आहे. रशियाने अमेरिकेवर क्षेपणास्त्र डागलीच, तर त्याचा मुकाबला करण्यासाठी अमेरिकेला हा विमानतळ सर्वाधिक उपयोगी आहेच; पण चीन आणि रशियाच्या आर्क्टिक महासागरातील हालचालींना शह द्यायलाही अमेरिकेच्यादृष्टीने ग्रिनलँड महत्त्वाचं आहे. ग्रीनलँडचं हे महत्त्व खुद्द ग्रीनलँड–डेन्मार्कच काय, अख्खा युरोप जाणतो. अमेरिकेने गोडीत घेतलं तर काम सहज होण्यासारखं आहे. पण, ट्रम्प यांचा आपण विश्वाधिपती असल्याचा गैरसमज झाला आहे. त्यातून आपण कोणाच्याही घरात, कोणाच्याही खिशात कधीही हात घालू शकतो, ही जी गुर्मी आली आहे, ती अधिक घातक आहे. फ्रान्स, ब्रिटनसह सगळे युरोपियन देश त्यामुळेच एका दिवसात एकवटले आणि ग्रीनलँडच्या बाजूने उभे ठाकले. यात ट्रम्प यांनी अमेरिकेची प्रतिष्ठा कशी वाढवली, हे त्यांचं त्यांनाच माहीत!

ट्रम्प यांनी पुढची दमदाटीची भाषा केली आहे, ती कोलंबिया, मेक्सिको, इराण आणि क्युबाला उद्देशून. इराण आणि अमेरिकेतलं हाडवैर जगजाहीर आहे. २०२० मध्ये जनरल कासिम सुलेमानी यांच्या हत्येसाठी झालेल्या अमेरिकेच्या हवाई हल्ल्यानंतर हे हाडवैर दोघांच्याही नसानसांत पोहोचलं. १९५९ मध्ये क्युबात फिडेल कॅस्ट्रो अंमल सुरू झाला. त्या काळात क्युबा रशियाच्या जवळ गेला, तो साम्यवादी विचारातल्या साम्यामुळे. त्याचा वाईट परिणाम अमेरिकेच्या व्यापारी हितसंबंधावर झाला. ते संबंध कॅस्ट्रोनंतरही न सुधारल्याने क्युबासारखा पिटुकला देशही अमेरिकेला सुरक्षेच्या दृष्टीने धोका वाटतो आहे!

## भोगीचे शास्त्र

मकर संक्रांतीला एवढे महत्व येण्याचे कारण म्हणजे मकरसंक्रांतीनंतर सुगीचे दिवस येतात. शेतामध्ये धान्य तयार झाल्यामुळे शेतकरी वर्ग देखील आनंदात असतो. या काळात भाज्याही अधिक प्रमाणात येतात. भोगीच्यादिवशी अनेक प्रकारच्या भाज्या, शेंगा आणि पालेभाज्या एकत्र करून एक भाजी बनवली जाते. या भाजीला वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. या दिवशी तीळ घालून बाजरीची भाकरी केली जाते. या भाजीचा आणि बाजरीच्या भाकरीचा नैवेद्य दाखवून कुलदेवीला भोग चढवून तिचा कृपाशीर्वाद घेतला जातो. भोगीच्या दिवशी असे करण्यामागे पिकांचे आणि वनस्पतींचे धन्यवाद मागण्याचा एक व्यापक दृष्टिकोन आहे. तसेच या दिवशी आंघोळीच्या पाण्यामध्ये तीळ घालून त्या पाण्याने अंघोळ केली जाते. त्यामुळे येणारा उन्हाळा बाधत नाही असे शास्त्र आहे. भोगीच्यादिवशी जुन्या विकृत म्हणजे चुकीच्या गोष्टींचा त्याग करून चांगल्या गोष्टी स्वीकारल्या गेल्यामुळे चांगले सकारात्मक बदल होतात. जो खाई भोगी तो सदा रोगी असे भोगीविषयी म्हटले जाते.

– **दिपाली गिते**, सातारा.

# बोगस वैद्यकीय व्यावसायिकांविरुद्ध जिल्हास्तरीय पुनर्विलोकन समितीची बैठक संपन्न



सांगली : बोगस वैद्यकीय व्यावसायिकांविरूद्ध जिल्हास्तरीय पुनर्विलोकन समितीची बैठक जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बोगस वैद्यकीय व्यावसायिकांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याकरिता ही समिती कार्यरत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात संपन्न झालेल्या या बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजयकुमार वाघ, पोलीस उपाधिक्षक तथा समितीचे सदस्य सचिव प्रभाकर मोरे, जिल्हा माहिती अधिकारी संप्रदा बीडकर यांच्यासह तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, जिल्ह्यात ग्रामीण भागात बोगस वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांचा शोध घेण्यासाठी मोहीम राबवावी. बोगस वैद्यकीय व्यावयासिकांना आळा घालण्यासाठी कडक प्रतिबंधात्मक कारवाई करावी. तसेच, याबाबत विविध माध्यमातून जनप्रबोधन करावे, असे त्यांनी सांगितले.

या बैठकीत जिल्ह्यातील अवैधरीत्या सुरू असलेल्या सर्व लॅबोरेटरी चालकांवर कारवाई करण्यासाठी सर्वेक्षण करावे. जिल्ह्यात अवैधरित्या आयुर्वेदिक, होमिओपॅथिक औषधोपचार करणाऱ्या बोगस व्यक्तिंवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी तसेच, अनधिकृत डेंटल लॅब चालविणाऱ्या विरुद्ध कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, याबाबत सूचित करण्यात आले.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजयकुमार वाघ यांनी बैठकीत उपस्थित विविध मुद्द्यांच्या अनुषंगाने वैद्यकीय कायद्याच्या परिभाषेच्या अनुषंगाने मत मांडले. प्रारंभी प्रभाकर मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा सादर केला.

# जिल्ह्यातील बोगस डॉक्टर शोध मोहिमेला गती द्या–जिल्हाधिकारी संतोष पाटील



सातारा : बोगस डॉक्टरच्या उपचारामुळे रुग्णाचा जीव जावू शकतो. त्यामुळे जिल्ह्यात बोगस डॉक्टर शोध मोहिमेला गती द्यावी. बोगस डॉक्टर आढळल्यास त्याच्यावर गुन्हा दाखल करावा. या कामाच्या प्रगतीचा आढावा पुढील बैठकीत द्यावा. बोगस डॉक्टर शोध मोहिमेत हयगय झाल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी आरोग्य विभागाचा आढावा घेतला. या बैठकीला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे, जिल्हा आरोग्य अधिकारी महेश खलीपे, सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ. राजेश गायकवाड यांच्यासह वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

बोगस डॉक्टर शोध मोहिम शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी संयुक्तपणे राबवावी, असे निर्देश देऊन जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, अंगणवाडी, आश्रम शाळा व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची वेळापत्रकानुसार आरोग्य तपासणी करावी. या तपासणीत बालकांना गंभीर आजार आढळल्यास तात्काळ उपचाराखाली आणावे. १०२ व १०८ रुग्णवाहिकांची सेवा खूप महत्वाची आहे. रुग्णाचा कॉल आल्यानंतर रुग्णवाहिका किती वेळेत पोहचतात, आत्तापर्यंत किती नागरिकांचे जीव वाचले याची माहिती पुढील बैठकीत सादर करावी.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही केंद्र शासनाची महत्वकांक्षी योजना आहे. या योजनेंतर्गत कातकरी समाजाला आयुष्मान भारत कार्ड काढून द्यावे. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा उद्देश असल्याने दर्जेदार आरोग्य सेवा मिळाल्या पाहिजेत. तसेच क्षय रोग मुक्त भारत अभियानातही वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपले योगदान द्यावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी केल्या. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीत कुष्ठरोग निवारण दिन व पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने प्रभात फेरी, महिला मेळाव्यासह शालेयस्तरावर विविध स्पर्धा घ्याव्यात. तसेच बाजाराच्या ठिकाणी पंधरवड्यासंदर्भात प्रदर्शन व आरोग्य मेळावे घ्यावेत. हा पंधरावडा आरोग्य विभागाने यशस्वी राबवावा, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी दिल्या.

# सागरेश्वर अभयारण्य पर्यटनवृध्दीसाठी सर्वंकष आराखडा करा–जिल्हाधिकारी अशोक काकडे

सांगली : सांगली जिल्ह्याच्या विकास आराखड्यांतर्गत सागरेश्वर अभयारण्य पर्यटन वृध्दीसाठी सर्वंकष आराखडा तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी दिल्या. या अनुषंगाने सागरेश्वर अभयारण्य येथील शासकीय विश्रामगृह येथे अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागीय वन अधिकारी श्रीकांत पवार, जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील, उपविभागीय अधिकारी रणजित भोसले, गटविकास अधिकारी प्रशांत राऊत, नायब तहसिलदार सागर कुलकर्णी, सु. धो. मोहिते आदि उपस्थित होते.निसर्ग पर्यटनाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या वैभवात भर टाकण्याबरोबरच या भागाचा कायापालट होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे सांगून जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी पर्यटनाच्या सर्वंकष आराखड्यात कृषि पर्यटन, कौशल्य विकास प्रशिक्षण, स्थानिकांना रोजगार अशा विविध माध्यमातून सन २०३० पर्यंत जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे सूचित केले. सागरेश्वर अभयारण्य हे एक मानव निर्मित अभयारण्य असून हे अतिशय उत्तम आणि उत्कृष्ट असे ठिकाण असल्याचे सांगून जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, या अभयारण्यामध्ये सांबर, चितळ, ससे आणि अनेक प्रकारचे प्राणी दिसतात. सांगलीतीलच नाही तर महाराष्ट्रातील पर्यटकांनी सागरेश्वर अभयारण्याला भेट देण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी सागरेश्वर पर्यटनवृद्धीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी अधिकारी व स्थानिकांशी संवाद साधला. तसेच, त्यांच्याहस्ते सागरेश्वर अभयारण्य येथे वृक्षारोपण करण्यात आले.



**देवराष्ट्रे येथे यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन**

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या कडेगाव तालुक्यातील देवराष्ट्रे येथील मूळ निवासस्थानी, जिथे त्यांचा जन्म झालेला आहे त्या घरी जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी भेट देऊन पाहणी केली. तसेच त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले

# रस्ते सुरक्षा जनजागृतीसाठी सामाजिक चळवळ उभी राहावी–जिल्हाधिकारी अशोक काकडे



सांगली : वाढते अपघात टाळण्यासाठी व रस्ते सुरक्षेसाठी वाहतूक नियम व रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती ही केवळ प्रशासकीय पातळीवरच न राहता यासाठी सामाजिक चळवळ उभी राहावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी आज येथे केले. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, सांगली व जिल्हा पोलीस दल, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३७ व्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाचा शुभारंभ आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी पोलीस अधीक्षक संदीप घुगे, अपर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद गाजरे, वाहतूक पोलीस निरीक्षक मुकुंद कुलकर्णी यांच्यासह पोलीस दल व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, पोलीस अंमलदार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, दर्जेदार रस्ते, रस्ते सुरक्षेसाठी विविध माध्यमांतून प्रबोधन करूनही रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. वाहतूक नियमांचे पालन न केल्याने जीवित हानी व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होते. वाहन चालविताना आपल्या छोट्या कृतीही अपघात टाळू शकतात. वाहन चालविताना मोबाईल फोनवर न बोलणे, योग्य वेगमर्यादा राखणे, हेल्मेट वापरणे व सीलबेल्ट लावणे अशा गोष्टींमुळे आपले कुटुंब सुरक्षित राहील, याची जाणिव सर्वांनी ठेवावी, असे ते म्हणाले.

पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी यावेळी सर्वांनी वाहन चालवताना वाहतूक नियमांचे गांभीर्याने पालन करण्याचे आवाहन केले. यावेळी रस्ता सुरक्षा विषयक जनजागृती करण्यासाठी काढण्यात आलेल्या दुचाकी, चार चाकी वाहनांच्या रॅलीस जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी हिरवा झेंडा दाखवून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणातून ही रॅली मार्गस्थ करण्यात आली. विश्रामबाग चौक, पुष्कराज चौक, राम मंदिर चौक, आमराई, कॉलेज कॉर्नर मार्गे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय सांगली येथे या रॅलीची सांगता झाली. या रॅलीमध्ये सांगली पोलीस दल, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडील अधिकारी, कर्मचारी तसेच ड्रायव्हिंग स्कूल संस्थाचालक, कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. प्रारंभी रस्ता सुरक्षा अनुषंगाने घ्यावयाच्या काळजीबाबत तयार करण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# रहदारीच्या रस्त्यावरच झाडांचे बुंधे, मातीचा ढीग;नागरिकांची कोंडी

## ठेकेदाराच्या ढिसाळ कारभारावर नागरिक संतप्त



उंब्रज(प्रतिनिधी): कळंत्रेवाडी,ता.कराड हद्दीत पाटण पंढरपूर राज्य मार्गाच्या विस्तारीकरणाचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. काल रस्त्यालगतची झाडे तोडून येथील वार्ड क्रमांक दोन कडे जाणाऱ्या रहदारीच्या रस्त्यावरच झाडांचे बुंधे, मातीचा ढीग टाकल्यामुळे येथील नागरिकांची कोंडी झाली असून जवळपास अर्धा किलोमीटर वरील डायवर्षणचा वापर येथील नागरिकांना करावा लागत आहे.

या गल्लीत दूध संकलनासाठी येणाऱ्या डेअरीच्या गाड्या तसेच इतर अवजड वाहनांना या झाडांच्या बुंध्यांचा अडथळा होत असून त्यामुळे स्थानिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. तसेच रात्री अपरात्री एखाद्या रुग्णाला दवाखान्यात नेण्याची वेळ आली तर येथील नागरिकांनी करायचे काय? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

त्यामुळे संबंधित ठेकेदाराने तात्काळ रस्त्यावरच पडलेले झाडांचे बुंधे तसेच मातीचा ढीग हटवून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

# वारसदार २४ ठरली यमाई केसरी

## श्री यमाई देवी यात्रेनिमित्त ग्रेहाऊंड श्वान स्पर्धा उत्साहात पार



औंध : येथे श्री यमाई देवी यात्रेनिमित्त श्वान शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये सुरेश वाडकर वाई यांची वारसदार २४ श्वान यमाई केसरी या किताबासह दहा हजार रुपये रोख रक्कम व आकर्षक भव्य चषक जिंकून पहिल्या क्रमांकाची मानकरी ठरली तर जनरल एनर्जी फॅन क्लब ची जुनियर एनर्जी ७००० रुपये रोख रक्कम व आकर्षक भव्य चषक बक्षीस घेऊन उपविजेता ठरली महाराष्ट्र कर्नाटक सह राज्यातील ११० नामांकित ग्रेहाऊंड श्वान शर्यतीत सहभागी झाले होते यात नर आणि मादी श्वानांचा सहभाग होता मैदान पाहण्यासाठी श्वानप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

राजवीर माने आंबेगाव यांची रॉयल साक्षी श्वान तिसऱ्या क्रमांकाची मानकरी ठरली तर जय मल्हार ग्रुप भेंडवडे यांचा अफीम ९३ चौथ्या क्रमांकाचा मानकरी ठरला गोल्डन ग्रुप महाराष्ट्र यांचा मिर्झा हा पाचव्या क्रमांकाचा, जय तुळजाभवानी प्रसन्न पुसवली यांची स्कायडोल सहाव्या क्रमांकाची, अक्षय मदने विझोरी यांचा राखणदार सातव्या क्रमांकाचा , इंद्रजीत जाधव पुसेगाव यांचा सायलेंट ब्लू आठव्या क्रमांक, तर घुमाई देवी प्रसन्न पिंपळे यांच्या आधीरा नवव्या क्रमांक, कारजाई रेसिंग क्लब लिंबाची वाडी यांचा कपूर दहाव्या क्रमांकाचा मानकरी ठरला विजेत्या १० श्वान मालकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

पंच म्हणून अनिकेत निकम व अमोल गावडे यांनी काम पाहिले या श्वान स्पर्धेचे समालोचन युवा तडफदार प्रकाश बुवा महागावकर यांनी केले स्पर्धा यशस्वी होण्यासाठी यात्रा कमिटीच्या कार्यकर्त्यांनी सर्व व्यवस्था केली होती श्वानस्पर्धा साठी रोहित पवार जाबाज शेख गणेश माकार यांनी विशेष कष्ट घेतले

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन – ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा – ४१५११० येथून प्रकाशित केले. * संपादक – गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# पत्रकारांनी भेदभावांना टाळून सद्‌भावनांनी संघटीत व्हावे : संजय एम.देशमुख

## लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाकडून जल्लोषात पत्रकार

## ४० पत्रकारांचा राज्यस्तरीय पुरस्कारांनी व ईतरांचेही सन्मान

अकोला : बदलत्या काळात कोसळणाऱ्या संकटांचा मुकाबला करण्यासाठी अवास्तव अहंभावाने निर्माण झालेल्या सर्व प्रकारच्या भेदभावांनी तिलांजली देऊन लहान मोठी वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक आणि डिजीटल मिडीयातील सर्व पत्रकारांनी संघटीत झालं पाहिजे. संभाव्य गंभीर धोक्यांना ओळखून स्वत:चा स्वाभिमान आणि अस्तित्वाचे रक्षण करण्यासाठी संघटीत होऊन सद्रभावनांनी एकत्र येणे ही वर्तमानाची खरी गरज आहे. त्यासाठी लोकस्वातंत्र्य चळवळीला महासंघ असे नाव देण्यात आलेले आहे.

म्हणून खऱ्या अर्थाने संघटीत शक्तीचे ध्येय गाठण्यासाठी राज्य आणि देशपातळीवरील सर्व पत्रकारांनी भेदापलिकडे विचार करून या समाजाभिमुख राष्ट्रीय प्रवाहात सहभागी व्हावे.असे वास्तव प्रतिपादन लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ या अ.भा.समाजाभिमुख राष्ट्रीय संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम.देशमुख यांनी केले. लोकस्वातंत्र्यकडून समाजाला अपेक्षित असणारा पत्रकार कसा असावा या विषयावर परिसंवाद व ४० पत्रकारांना राज्यस्तरीय पुरस्कारांनी व ईतरांना शाल व पुष्पगुच्छ देऊन संटनेकडून स्नेहपूर्वक सन्मानित करण्यात आले.लहान मोठी वृत्तपत्रे , इलेक्ट्रॉनिक्स आणि डीजीटल मिडीयातील पत्रकारांच्या भरगच्च उपस्थितीत हा पत्रकार दिन साजरा करण्यात आला. उपस्थित मान्यवर व पदाधिकाऱ्यांनी पत्रकार कसा असावा आणि समाजासाठी त्याचे काय योगदान असावे या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

लोकस्वातंत्र्यचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार प्रदिप खाडे या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.तर अकोला जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार प्रमुख अतिथी म्हणून तर ज्येष्ठ पत्रकार स्तंभलेखक प्रा.मोहन खडसे,सिध्दहस्त पत्रकार महेन्द्र कवीश्वर, ॲड. अनंतराव खेळकर,दिनेश शुक्ल,निशाली पंचगाम,माणिकराव कांबळे,खामगावचे ज्येष्ठ पत्रकार व लोकस्वातंत्र्यचे महाराष्ट्र संघटन प्रमुख जगदिश अग्रवाल,विदर्भ संघटक सागर मोदी यांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी सर्वप्रथम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज , कर्मयोगी संत गाडगेबाबा व महपुरूषांना अभिवादन आणि शहिद जवानांसह विविध बळींना श्रध्दांजली वाहण्यात आली.लोकस्वातंत्र्य पत्रकार भूषण सेवागौरव व लोकस्वातंत्र्य प्रभावी पत्रकारिता सेवा गौरव या राज्यस्तरीय पुरस्कारांनी ४० पत्रकारांना व ईतर पत्रकार बाधवांना शाल व पुष्पगुच्छांनी पत्रकार दिनी सन्मानित करण्यात आले.लोकस्वातंत्र्य विदर्भ अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ.किरण वाघमारे व विदर्भ संघटन प्रमुख म्हणून राजेश खारोडे यांना पुरस्कारांसोबतच नियुक्तीपत्र व आय कार्ड प्रदान करण्यात आले.

सौ.जया भारती यांच्या संचलनाखाली झालेल्या या कार्यक्रमाला राष्ट्रीय सचिव राजेन्द्र देशमुख, अंबादास तल्हार, सिध्देश्वर देशमुख,पुष्पराज गावंडे, प्रा.डॉ.किरण वाघमारे,राजेश खारोडे, पंजाबराव वर, सागर लोडम,श्रीकृष्ण माळी, दिपक देशपांडे, धनंजय मिश्रा,सतिश देशमुख, गजानन मुऱ्हे, पंकज देशमुख,सौ. दिपाली बाहेकर, बुढण गाडेकर,मनोहर मोहोड, श्रीराम खारोडे, शामराव देशमुख, नारायणराव अंधारे, संभाजीराव टाले,प्रबोध देशपांडे, शैलेंद्र दुबे,गजानन हरणे,नरेन्द्र देशमुख, फुलचंद वानखडे,अमित इंगळे, अजय वानखडे, प्रकाश शिरसाट, डॉ.अशोक शिरसाट,एजाज अहमद,रहेमान खान, गजानन वानखडे, राजू चिमणकर,विजय केंदरकर, श्रीकांत पाचकवडे,अनिल मावळे, राजकुमार उखळकर, शिवराजे जामोदे, दिलीप ब्राम्हणे, संतोष येलकर,अड संजय कमल देशमुख, शिवाजी भोसले,विवेक चांदूरकर, अविनाश भगत, नागोराव मोहोड, गजानन थोरात व बहूसंख्य पत्रकार उपस्थित होते.आभारप्रदर्शन सौ.दिपाली बाहेकर यांनी केले.

# गरजू व्यक्तींना व्हीलचेअर व चार स्टॅन्ड आधारकाठींचे वाटप




मसूर : समाजातील दुर्बल, गरजू व निराधार घटकांसाठी मदतीचा हात पुढे करत आपली सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली. मसूर जिल्हा परिषद गटातील सर्व गावात ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, पॅरालिसिसग्रस्त तसेच चालण्यात अडचण येणाऱ्या गरजू व्यक्तींना व्हीलचेअर व चार स्टॅन्ड आधारकाठींचे वाटप करण्यात येऊन माणुसकीपण जपले.

त्यांच्या कार्याचे समाजातून कौतुक होत आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात दुर्लक्षित राहणाऱ्या घटकांसाठी आधार बनण्याचे कार्य दिपालीताई खोत सातत्याने करत असून, या उपक्रमामुळे अनेक गरजू व्यक्तींना दैनंदिन जीवन जगणे सुलभ होणार आहे. आजारपणामुळे हालअपेष्टा सहन करणाऱ्या लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर या मदतीमुळे समाधान व दिलासा दिसून आला.

या उपक्रमाबद्दल लाभार्थ्यांनी दिपालीताई खोत

**किवळ येथील जयश्रीताई म्हणाल्या आमचा बेड रेस्ट वर असलेल्या सासूबाईंना सर्व गोष्टीसाठी उचलून ने आ करावे लागत होती बाहेर कुठे जाता येत नव्हते पण दिपाली ताईंनी गरज ओळखून दिलेल्या व्हीलचेअरमुळे संपूर्ण कुटुंबात आनंद झाला कारण स्वत: सासुबाई व्हील चेअरच्या साह्याने बहुतांशी कामे स्वत:च करतात अशी कृतज्ञता व्यक्त करून दिपालीताईंच्या कार्याचे कौतुक केले.**

यांच्या सामाजिक जाणिवेचे व सेवाभावी वृत्तीचे मनापासून कौतुक करत आभार व्यक्त केले. गरजूंसाठी केलेले छोटेसे योगदानही त्यांच्या आयुष्यात मोठा बदल घडवू शकते, अशी भावना दिपालीताईंनी यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमास मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना शासकीय समिती अध्यक्ष दिपालीताई खोत यांच्यासह भाजपा सरचिटणीस पुरंदर जाधव, व्यापारी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष अतुल शहा, कराड उत्तर उपाध्यक्ष रघुनाथ शेडगे, अमोल साळुंखे, राजेंद्र लोहार, बापुसो लोहार, डॉ. मनिषा खोत, माजी सरपंच शंकरराव धस, वाण्याचीवाडीचे पोलिस पाटील शशिकांत खोत, सूर्यकांत पाटील, संजय सावंत, लक्ष्मण साळुंखे, रणजीत जाधव, बबन साळुंखे, जयसिंग साळुंखे (निवृत्त तलाठी), बाबुराव धस तसेच लाभार्थी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. वेद बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या माध्यमातून भविष्यातही समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा संकल्प दिपालीताई खोत यांनी व्यक्त केला असून, अशा उपक्रमांमुळे समाजातील दुर्बल घटकांना खऱ्या अर्थाने आधार मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## साहित्य संमेलनाच्या अटेकेपार डिजीटल स्मरणीकेचे प्रकाशन

# १८ लाख लोकांपर्यंत स्मरणीका पोहचणार-सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले

## साहित्य संमेलनास योगदान देणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सन्मान

सातारा : सातारा येथे झालेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रत्यक्ष १० लाखाहून अधिक तर ऑनलाईन साडे सात कोटी नागरिक सहभागी झाले. हे सर्व सातारकर, साहित्य परिषद, मावळा फौंडेशनचे पदाधिकारी व प्रशासनामुळे शक्य झाले. ९९ वे साहित्य संमेलन सातारकराच्या कायम स्मरणात राहील, असे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

यावेळी त्यांनी संपूर्ण प्रशासनाचे आभार मानत प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार केला. अटकेपार साहित्य संमेलनाच्या डिजिटल स्मरणिकेचे प्रकाशन केले. ही स्मरणीका १८ लाख लोकांपर्यंत डिजीटल पद्धतीने पोहचविण्यात आली. ९९ व्या साहित्य संमेलनाचे हे एक अगळे वेगळे वैशिष्ट ठरले.

सार्वजकनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या सुरुची निवासस्थानी हा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, नगराध्यक्ष अमोल मोहिते, कोषाध्यक्ष नंदकुमार



सावंत, रविंद्र बेडकीहाळ, मुकुंद फडके आदी उपस्थित होते. सातारा येथे झालेल्या अस्मरीणय साहित्य संमेलनाने विक्रमांचे अनेक मापदंड निर्माण केले. या साहित्य संमेलना १० कोटीहून अधिक रुपये पुस्तकांची विक्री झाली.

साहित्य संमेलनातील मुख्य कार्यक्रमांसह गजल कट्टा, कवी कट्टा, बाल कट्टा, प्रकाशन कट्ट्या नागरिकांची उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. शंभरावे साहित्य संमेलन पुणे येथे होत असले तरी सातारा येथे झालेल्या ९९ व्या साहित्य संमेलनाच्या आठवणी कधीही पुसल्या जाणार नाहीत. या साहित्य संमेलनाला पालकमंत्री शंभूराज देसाई, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील, जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्यासह सार्वजनिक बांधकाम, पोलीस, शिक्षण, सहकार विभागाचे, नगर प्रशासन, जिल्हा माहिती कार्यालय यांच्यासह सर्व विभागांचे मोलाचे सहकार्य केले असल्याचे मंत्री श्री. भोसले यांनी यावेळी सांगितले. साहित्य संमेलनाची स्मरणीका निर्मितीमध्ये मुकुंद फडके यांच्यासह योगदान देणाऱ्या सर्वांचे त्यांनी अभिनंदन केले. ही डिजिटल स्मरणीका १८ लाख लोकांपर्यंत पोहचविली जाणार असून हा ही एक आगळा वेगळा विक्रमच ठरेल. याशिवायही साहित्य संमेलनाच्या संकेतस्थळावरुन ही स्मरणीका डाऊनलोड करता येईल.

मराठी नाट्य संमेलन यजमान पद साताराला मिळण्यासाठी मराठी भाषा मंत्री उदय सामंत व नाटय संमेलनाचे अध्यक्ष प्रशांत दामले यांच्याशी चर्चा झाली आहे. नाट्य संमेलन सातारा जिल्ह्याला मिळाल्यास त्योचही भव्यदिव्य असे आयोजन करण्यात येईल, असेही मंत्री श्री. भोसले यांनी सांगितले.

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत वाघजाई क्रीडा मंडळ रत्नागिरी संघ विजेता

## स्व.जयवंतराव भोसले यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त आयोजन: साई सेवा क्रीडा मंडळ छत्रपती संभाजीनगर उपविजेता



शिवनगर : सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले (आप्पासाहेब) यांच्या १०१ व्या जयंतीनिमीत्त य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर आयोजित राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत वाघजाई क्रीडा मंडळ रत्नागिरी संघाने अजिंक्यपद पटकावले. तर साई सेवा क्रीडा मंडळ छत्रपती संभाजीनगर संघ स्पर्धेत उपविजेता ठरला. कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या हस्ते विजेत्या संघाला पारितोषीक वितरण करण्यात आले.

यावेळी संचालक जितेंद्र पाटील, शिवाजी पाटील, जे डी मोरे, अविनाश खरात, धोंडीराम जाधव ,मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य संजय पवार, प्राचार्य डॉ.अशोक फरांदे, कराड तालुका साखर कामगार संघाचे अध्यक्ष एम.के. कापूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिवमुद्रा क्रीडा मंडळ कौलव संघाने तृतीय क्रमांक तर प्रकाश तात्या बालवडकर क्रीडा मंडळ पुणे या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला. साई सेवा क्रीडा मंडळ छत्रपती संभाजीनगर संघाचा राहुल टेके हा अष्टपैलू खेळाडू ठरला. शिवमुद्राचा साहिल पाटील उत्कृष्ट चढाईचा मानकरी तर वाघजाई संघाचा साईराज कुंभार उत्कृष्ट पकडचा मानकरी ठरला.

रुपेश जाधव यांनी स्पर्धे चे पंचप्रमुख, रमेश देशमुख यांनी साहाय्यक म्हणून तर शशिकांत यादव यांनी स्पर्धेचे निरीक्षक म्हणून काम पाहिले. प्रा. संजय पाटील, ज्ञानदेव पाटील, प्रा.अमोल मंडले, राहुल निकम, आबासो यादव, प्रा. महेश कुंभार आदींनी स्पर्धे चे संयोजन केले. याप्रसंगी हेमंत धर्मे, राजेंद्र दुर्गावळे, विक्रम साळुंखे, वसंतराव पवार, कृष्णत कापूरकर, धनंजय मोहिते, सदाशिव कदम, सुरेश साळुंखे, प्रदीप साळुंखे, व्यंकटराव जाधव यांच्यासह कारखान्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थीत होते.

प्रो कबड्डीच्या स्टार खेळाडूंची उपस्थिती

देशातील नामांकित प्रो- कबड्डी स्पर्धेत दबंग दिल्ली संघाकडून खेळणाऱ्या अजिंक्य पवार, सुशांत साईल आणि पाटणा पायरेट्स कडून खेळणाऱ्या शुभम शिंदे आणि साहिल पाटील यांनी कारखाना कार्यस्थळावर राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेच्या निमित्ताने उपस्थिती होती. त्यांचा कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# मसूर जिल्हा परिषद गटातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा

मसूर : मसूर जिल्हा परिषद गटातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा संवाद मिळावा आज शुक्रवार दिनांक नऊ रोजी मसूरता कराड येथील सिद्धेश कार्यालयात सायंकाळी पाच वाजता होत आहे मसूर जिल्हा परिषदेचे इच्छुक उमेदवार पवन दादा निकम मित्र परिवारांच्या वतीने प्रथमच घेण्यात आलेल्या मेळाव्यात कराड उत्तरचे जलनायक व कार्यसम्राट आमदार मनोज दादा घोरपडे हे प्रमुख उपस्थित राहणार असून मेळाव्यास संबोधित करणार आहेत. मसूर जिल्हा परिषद गटातील रखडलेल्या विकास कामासाठी आणि पाणी योजनांच्या पूर्तीसाठी जननायक पाणीदार आमदार यांचे हात बळकट करण्यासाठी मसूर जिल्हा परिषद गटातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान संयोजक पवन दादा निकम मित्रपरिवार यांच्यावतीने करण्यात आले आहे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या पार्श्वभूमीवर प्रथमच मसूर येथे कार्यसम्राट आमदार मनोज दादा घोरपडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होत असलेल्या संवाद मेळाव्यात नेमकी कोणती दिशा ठरणार? कोणत्या विषयावर मनोज दादांची तोफ धडाडणार? कोणाचे पक्षप्रवेश होणार का? याविषयी उत्सुकता लागून राहिली आहे.

# औंध येथे शालेय गरजू विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप

औंध((वार्ताहर): जिल्हा परिषद शाळा औंध येथे अयान फाउंडेशन वाघेरी तालुका.कराड यांच्या वतीने ३२ गरीब व गरजू विद्यार्थ्यांना पक्का पाया प्रकाशित पुस्तिका वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अन्सार पटेल म्हणाले की,प्राथमिक शाळेतले शिक्षण हा विद्यार्थांच्या आयुष्यातील खूप मोठा टप्पा आहे या वयात विद्यार्थ्यांची बौद्धिक, शारीरिक, मानसिक चांगली वाढ झाली पाहिजे. विद्यार्थी पुढील आयुष्यात कसा घडणार या साठी आत्ताची पायरी खुप महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांना



शैक्षणिक कोणतीही कमतरता राहू नये गरिबातला गरीब विद्यार्थी देखील शिक्षण घेऊन स्वताच्या पायावर उभा रहावा यासाठी अयान फाउंडेशन कडून नेहमीच शाळेस सहकार्य राहील असे त्यांनी सांगितले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.जाधव म्हणाल्या की,त्यांनी सांगितले मुलांना खुप गरजेचं असलेलं पक्का पाया पुस्तक विद्यार्थ्यांना गुणवत्ता वाढीसाठी नक्कीच मदत करतील व विद्यार्थ्यांना हे पुस्तक खुप गरजेचे होते. व संस्थेने ते दिल्याबद्दल त्यांनी संस्थेला धन्यवाद दिले. व शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीस आम्ही नेहमीच सतर्क असल्याचे त्यांनी सांगितले.या प्रसंगी शालेय व्यवस्थापक समितीचे सदस्य सौ.सुप्रिया इंगळे ,सामाजिक कार्यकर्ते कुलदीप आप्पा इंगळे ,सौ. राऊत ,अमोल इंगळे ,विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. राजेंद्र सानप यांनी प्रास्ताविक केले तर आभार शिंदे यांनी मानले.

# रस्ता रुंदीकरण कामावरून प्रशासकीय यंत्रणा, ठेकेदार आणि शेतकरी यांच्यात संघर्ष

## शेतकऱ्यांनी दिला जनआंदोलन उभारण्याचा इशारा



कराड : मायणी ते निसरे फाटा या ६० किलोमीटर अंतराच्या रस्ता रुंदीकरणाच्या कामावरून सध्या कराड तालुक्यात प्रशासकीय यंत्रणा, ठेकेदार आणि शेतकरी यांच्यात तीव्र संघर्षाची ठिणगी पडली आहे. रस्ता रुंदीकरणाची कोणतीही कायदेशीर अधिसूचना न काढता आणि जमिनींचा योग्य मोबदला न देताच प्रशासन,ठेकेदाराने काम सुरू केल्याने, बाधित क्षेत्रातील शेतकरी आता रस्त्यावर उतरला आहे. या प्रकरणात प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

मायणी ते निसरे फाटा या दरम्यान रस्ता रुंदीकरणाचा हा प्रश्न विशेषतः कराड तालुक्यातील अंतवडी, रिसवड, वडोली भिकेश्वर, शिवडे, उंब्रज, कळंत्रेवाडी आणि चरेगाव या गावांसाठी गंभीर बनला आहे. या गावांच्या सीमांतून जाणाऱ्या रस्त्यासाठी शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी संपादित केल्या जात आहेत. मात्र, या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याने शेतकरी आक्रमक झाले असून त्यांनी या कामाला विरोध दर्शवला आहे. सध्या या सर्व गावांतील शेतकऱ्यांनी आपापल्या पातळीवर बैठका घेऊन प्रशासनाविरुद्ध एल्गार पुकारला आहे. जर येत्या काही दिवसांत प्रशासनातील संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणी तोडगा काढला नाही आणि शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत, तर कराड तालुक्यातील बाधित पट्ट्यातील शेतकऱ्यांकडून जनआंदोलन उभे करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, एकीकडे रस्ता रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आणि दुसरीकडे कराड तालुक्यातील शेतकऱ्यांचा वाढता विरोध, अशा कात्रीत प्रशासन अडकले आहे. आता प्रशासन नमती भूमिका घेऊन शेतकऱ्यांशी संवाद साधावा लागणार आहे. दरम्यान, शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा पाहता प्रशासनाने आवश्यक हालचाली न केल्यास हा प्रश्न लवकर सुटण्याची चिन्हे दिसत नाहीत.

**१. कायदेशीर अधिसूचनेला केराची टोपली : कोणताही रस्ता रुंदीकरणाचा प्रकल्प सुरू करण्यापूर्वी भू-संपादन कायद्यानुसार अधिकृत अधिसूचना प्रसिद्ध करणे बंधनकारक असते. मात्र, येथे अशी कोणतीही प्रक्रिया पूर्ण न करताच थेट जमिनींवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. २. मोबदल्याचा पत्ता नाही: रस्ता रुंदीकरणात ज्यांच्या जमिनी, झाडे किंवा बांधकामे जात आहेत, त्यांना अद्याप सरकारी नियमानुसार मिळणारा मोबदला निश्चित करून देण्यात आलेला नाही. आधी मोबदला द्या, मगच काम करा, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे.**
**३. मनमानी आणि दडपशाही : कामाच्या ठिकाणीा संबंधित विभाग व ठेकेदाराकडून शेतकऱ्यांशी संवाद साधण्याऐवजी मनमानी पद्धतीने काम रेटून नेले जात आहेत. यंत्रसामग्रीचा वापर करून उभ्या पिकांचे नुकसान केले जात असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत.**

**निसरे ते मायणीदरम्यान रस्ता रुंदीकरणाचे काम बेकायदेशीर सुरू आहे. हे रस्त्याचे काम म्हणजे शेतकऱ्यांच्या हद्दीत सरळ सरळ अतिक्रमण आहे. बाधितांना न्याय मिळवून देण्यासाठी रक्षक प्रतिष्ठानचे संस्थापक सुशीलदादा मोझर यांच्या मार्गदर्शनाखाली बाधित शेतकऱ्यांची कृती समिती स्थापन करणार आहे. या कृती समितीच्या माध्यमातून बाधित शेतकऱ्यांना एकत्र घेत मुजोर ठेकेदार व संबंधित प्रशासनाविरोधात लवकरच जन आंदोलन उभे केले जाणार आहे.**
**- मनोज माळी, जिल्हाध्यक्ष, रक्षक प्रतिष्ठान, सातारा**

**आमच्या पूर्वजांनी कष्टाने कमावलेल्या या जमिनी आहेत. विकासाला आमचा विरोध नाही, पण तो विकास आमच्यावर अन्याय करून का? प्रशासनाने आम्हाला विश्वासात न घेता कामाला सुरुवात कशी केली? मोबदला मिळत नाही तोवर कसलेच काम सुरू ठेऊ नये.**
**- सिद्धनाथ शिंदे**
**बाधित शेतकरी, अंतवडी ता. कराड**

# पाली येथे पोलिसांचा छापा

## गव्हाच्या पिकात गांजाचे आंतरपीक उघड

सातारा : सातारा तालुका पोलिसांनी कास परिसरातील पाली गावात धडाकेबाज कारवाई करत गव्हाच्या पिकात लपवून ठेवलेले गांजाचे आंतरपीक उघडकीस आणले. सुमारे तीस गुंठे क्षेत्रात लागवड केलेला अंदाजे ५० किलो गांजा पोलिसांनी जप्त केला असून, याप्रकरणी एका संशयितास ताब्यात घेण्यात आले आहे.

गुप्त माहितीच्या आधारे तालुका पोलिसांनी ही कारवाई केली. गव्हाच्या पिकाआड गांजाची लागवड करून ती लपवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघडकीस आला. जप्त केलेल्या गांजाची किंमत मोठ्या प्रमाणात असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

या प्रकरणी पुढील तपास तालुका पोलीस करीत असून, गांजा लागवडीमागील साखळी आणि इतर संबंधितांचा शोध घेतला जात आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अवैध अंमली पदार्थ विरोधातील पोलिसांची भूमिका पुन्हा एकदा ठामपणे समोर आली आहे.

# पाचवड फाटा ऊसदर आंदोलन; १३ वर्षांनंतर निर्दोष मुक्तता



सातारा : २०१३ साली पाचवड फाटा कराड येथे झालेल्या ऊसदरांच्या आंदोलनातील गुन्ह्यातून आज सातारा जिल्हा सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता दिली आहे.

त्या वेळी साखर कारखानदारांनी २००० रुपये प्रति क्विंटल उचल जाहीर केली होती. आंदोलनामुळे शेतकऱ्यांना २५०० रुपये प्रति क्विंटल उचल मिळाली, आणि सांगली, कोल्हापूर व सातारा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर रास्ता रोको, बस तोडफोड व जाळपोळसह विविध आंदोलन करण्यात आले. या कारवाईत शेकडो कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले गेले होते.

आज जवळपास १३ वर्षांनंतर या गुन्ह्यातून माझ्यासह सदाभाऊ खोत आणि पंजाबराव पाटील यांची निर्दोष मुक्तता झाली आहे. या प्रकरणातील न्यायालयीन कामकाज ॲड. विजय चव्हाण यांनी पाहिले. यामुळे त्या काळातील शेतकरी आंदोलन आणि कार्यकर्त्यांच्या धैर्याला न्याय मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# 'कृष्णा'वर स्व. पतंगराव कदम यांना अभिवादन



शिवनगर : य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर राज्याचे माजी मंत्री स्व. डॉ. पतंगराव कदम यांच्या ८२ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या आठवणींना व कार्याला उजाळा देण्यात आला.

याप्रसंगी कारखान्याचे संचालक जितेंद्र पाटील, संचालक बाबासो शिंदे, मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार, माजी संचालक ब्रिजराज मोहिते, बहेचे माजी उपसरपंच मनोज पाटील, कराड तालुका साखर कामगार संघाचे अध्यक्ष एम. के. कापूरकर आदींसह मान्यवरांनी स्व. डॉ.पतंगराव कदम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कराडमध्ये श्री साई पालखी स्नेहसोहळ्याचे आयोजन

## रविवारी विविध धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम; साई भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन



कराड : श्री साईबाबांच्या कृपाशीर्वादाने कराड येथे श्री साई पालखी स्नेहसोहळा २०२६ भक्तिमय व आध्यात्मिक वातावरणात संपन्न होणार आहे. श्री साई पालखी सोहळा समिती, कराड यांच्या वतीने रविवारी जानेवारी रोजी या भव्य स्नेहसोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती साईबाबा पालखी सोहळा समिती, कराडचे संस्थापक उदयसिंह शं. देसाई यांनी केले आहे.

या स्नेहसोहळ्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्षजी गाडीलकर (भा.प्र.से.) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच प. पू. गोविंद वासुदेव रानडे (नामस्मरण, कोल्हापूर) यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. याशिवाय या कार्यक्रमास सुरेशराव वाबळे, दिलीप रोहम, प्रकाशशेठ कुतवळ, डॉ. संजय सावंत, जयसिंग पवार, अनिल शिंदे, डॉ. शिवाजीराव कुंडलकर, विनोद शहा, दिलीपशेठ यादव, रविंद्र आहेर, सुभाषभाई शहा, राजेंद्र आहेर आदी साईभक्त मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात पहाटे ५.१५ वाजता साईंच्या काकड आरतीने होणार आहे. त्यानंतर संतकवी दासगणू महाराज विरचित श्री साईनाथ स्तवनमंजरी वाचन, श्री साई पादुकांचा महाअभिषेक, श्री साईसत्यव्रत महापूजा, श्री साई सच्चरित सामुदायिक पारायण व संतकवी दासगणू महाराज विरचित गुरुपाठाचे अभंग व प. पू. गोविंद वासुदेव रानडे हे निरामय आरोग्याचा राजमार्ग याविषयी मार्गदर्शन करणार असून, असे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

दीप प्रज्वलन १२.३० वाजता, त्यानंतर मान्यवरांचे विचार व मार्गदर्शन होणार असून, दुपारी १ वाजता श्री साईंची माध्यान्ह आरती व त्यानंतर साईंचा महाप्रसाद (भंडारा) आयोजित करण्यात आला आहे. दुपारी १ ते ५ या वेळेत 'झाले तुझे दर्शन साई' हा मराठी-हिंदी साईभजनांचा विशेष सुस्वर सोहळा रंगणार आहे. हा भक्ती, सेवा व स्नेह यांचा संगम असलेला सोहळा पंकज मल्टिपर्पज हॉल, पुणे-बंगळूर हायवे, कराड येथे होणार असून, साईभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री साई पालखी सोहळा समिती, कराड यांच्यावतीने अध्यक्ष उदयसिंह शं. देसाई यांनी केले आहे.

# शिवाजीराव देसाई विद्यालयामध्ये मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात

पाटण : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक भविष्यास योग्य दिशा मिळावी यासाठी १० वी नंतर पुढे काय? या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन श्रीमती विजयादेवी देसाई ज्युनिअर कॉलेज दौलतनगर या महाविद्यालयाच्या वतीने मोरणा शिक्षण संस्थेच्या शिवाजीराव देसाई विद्यालय सोनवडे या विद्यालयामध्ये करण्यात आले होते.

या एकदिवसीय कार्यशाळेमध्ये दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर उपलब्ध असलेल्या विज्ञान, कला, वाणिज्य शाखा, तसेच आयटीआय, पॉलिटेक्निक, डिप्लोमा, विविध व्यावसायिक अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा व करिअरच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार व क्षमतेनुसार करिअरची निवड करावी, असा मोलाचा सल्ला दिला.

यावेळी अभ्यासाचे नियोजन, पालकांची भूमिका, कौशल्य विकासाचे महत्त्व, बदलत्या काळातील रोजगार संधी यावरही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री शरद शेजवळ सर हे होते,या वेळी ते म्हणाले की,भविष्यातील शिक्षण व करिअरबाबत योग्य दिशा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे ते मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यशाळेसाठी ज्युनिअर कॉलेजच्या प्रा.कु.मयुरा निकम, प्रा. रोहिणी यादव, प्रा. निलोफर संदे,. इनामदार एच.एस. प्रा.कु.रजपूत एस. पी.प्रा.कु.शेजवळ टी.जे. यांनी मार्गदर्शन केले. प्रास्तविक श्री. संतोष कदम यांनी केले तर आभार श्री संजय डोंगरे सर यांनी मानले.

**प्रचार साहित्य महागले; झेंडे, बिल्ले, टोप्यांना मोठी मागणी**

मुंबई : मुंबईसह राज्यातील २९ महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. मतदानाचा दिवस जवळ येत असल्याने उमेदवारांच्या प्रचाराने चांगलाच वेग घेतला आहे.

# शिवाजीराव देसाई विद्यालयामध्ये मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात




पाटण : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक भविष्यास योग्य दिशा मिळावी यासाठी १० वी नंतर पुढे काय? या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन श्रीमती विजयादेवी देसाई ज्युनिअर कॉलेज दौलतनगर या महाविद्यालयाच्या वतीने मोरणा शिक्षण संस्थेच्या शिवाजीराव देसाई विद्यालय सोनवडे या विद्यालयामध्ये करण्यात आले होते. या एकदिवसीय कार्यशाळेमध्ये दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर उपलब्ध असलेल्या विज्ञान, कला, वाणिज्य शाखा, तसेच आयटीआय, पॉलिटेक्निक, डिप्लोमा, विविध व्यावसायिक अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा व करिअरच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार व क्षमतेनुसार करिअरची निवड करावी, असा मोलाचा सल्ला दिला.

यावेळी अभ्यासाचे नियोजन, पालकांची भूमिका, कौशल्य विकासाचे महत्त्व, बदलत्या काळातील रोजगार संधी यावरही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री शरद शेजवळ सर हे होते,या वेळी ते म्हणाले की,भविष्यातील शिक्षण व करिअरबाबत योग्य दिशा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे ते मत त्यांनी व्यक्त केले.या कार्यशाळेसाठी ज्युनिअर कॉलेजच्या प्रा.कु.मयुरा निकम, प्रा. रोहिणी यादव, प्रा. निलोफर संदे,. इनामदार एच.एस. प्रा.कु.रजपूत एस. पी.प्रा.कु. शेजवळ टी.जे. यांनी मार्गदर्शन केले. प्रास्तविक श्री. संतोष कदम यांनी केले तर आभार श्री संजय डोंगरे सर यांनी मानले.

# महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींची मताची राखी कोणाच्या पारड्यात

महाराष्ट्रातील राजकारणात सध्या एक वेगळीच घडामोड सुरू आहे. राज्यभर चर्चेचा विषय बनलेला आहे लाडक्या बहिणीचा प्रश्न मताची राखी कोणाला बांधायची? २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीवेळी लाडके भाऊ एकनाथ भाई एकत्र आले होते, मात्र आता सवते वेगळे झाले आहेत. प्रत्येक लाडका भाऊ स्वतःला बहिणीचा लाडका भाऊ मानत असल्यामुळे मताची राखी कोणाला बांधावी, हे ठरवणे गोंधळलेले आहे.



एकनाथ भाई म्हणतात, मीच लाडक्या बहिणीची ओवाळणी सुरू केली आहे. अजित दादा म्हणतात, तिजोरीची चावी माझ्याकडे आहे, मीच बहिणीची ओवाळणी व्यवस्थित करतो. देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या नावाचे नामांतर करून देवाभाऊ केले असून, योजनेचे नावच 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' ठेवले आहे.

या मतभेदांमुळे राज्यभर लाडक्या बहिणींची पंचायत सुरू झाली आहे. सध्या महानगरपालिकेच्या निवडणुकांमध्ये लाडके भाऊ एकमेकांविरोधात लढत आहेत, आणि बहिणीला प्रश्न पडला आहे की मताची राखी कोणाला बांधावी. बहिणींचा दुसरा प्रश्न असा आहे की, प्रत्येक निवडणूक वेगळ्या ओवाळणीची व्यवस्था करावी, एकाच ओवाळणीत वारंवार मताची राखी बांधली जाऊ नये. २०२४ विधानसभेच्या निवडणुकीत राखी बांधलेली असल्यामुळे आता नवीन ओवाळणीची आवश्यकता भासते.

सध्या बहिणीची सूचना अशी आहे: तिघांनी एकत्र येऊन लाडका भाऊ कोण हे ठरवावे, नाहीतर आमचा लाडका चुलत भाऊ होणार मताची राखी बांधण्याचा पर्याय. पंजाबराव पाटील, संस्थापक अध्यक्ष, बळीराजा शेतकरी संघटना यांनी नमूद केले आहे की, हे राजकीय 'धर्म संकट' लवकर सोडवले नाही तर बहिणीची मताची राखी योग्यरित्या ठरू शकणार नाही.

# हयगयमुळे मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या आरोपीस तीन वर्षे साधी कैद व ४,२०० रुपयांचा दंड

सातारा : हयगयपणे वाहन रस्त्यात उभे करून निष्काळजीपणामुळे सायकलस्वाराचा मृत्यू झाल्याप्रकरणी न्यायालयाने आरोपीस तीन वर्षांची साधी कैद व एकूण ४,२०० रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली आहे. हा निकाल प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. श्री. अरविंद शं. वाघमारे यांनी दिला.

या प्रकरणानुसार, दि. ३१ ऑगस्ट २०१६ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास सातारा शहरातील आकाशवाणी झोपडपट्टी ते महानुभव मठ रस्त्यावर, आकाशवाणी केंद्रासमोर आरोपी अविनाश शंकर पवार (वय २३, रा. रविवार पेठ, सातारा) याने त्याचा टेम्पो (क्र. एमएच-११ बीएल-५८६५) रस्त्यात निष्काळजीपणे उभा केला होता. टेम्पोमध्ये पानफळ्या सुमारे सहा ते सात फूट बाहेर येतील अशा पद्धतीने ठेवण्यात आल्या होत्या. तसेच कोणतीही सुरक्षितता उपाययोजना न करता व वाहनाच्या लाईट्स न लावता टेम्पो रस्त्यात उभा ठेवल्याने मागून येणाऱ्या सायकलस्वार आकाश विजय विभूते (वय २०, रा. आकाशवाणी झोपडपट्टी, सातारा) यांना धडक बसली. या अपघातात विभूते यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेप्रकरणी शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. पी. डी. देवकाते यांनी तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. खटल्यादरम्यान सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील श्रीमती अनुराधा शंकर निवाळकर यांनी प्रभावी युक्तिवाद केला. एकूण सात साक्षीदारांची साक्ष तपासण्यात आली. प्रत्यक्षदर्शी व परिस्थितीजन्य पुरावे तसेच उच्च व सर्वोच्च न्यायालयांच्या निर्णयांचे दाखले ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी दोषी ठरविला. न्यायालयाने आरोपीस भादंवि कलम ३०४ (२) अंतर्गत तीन वर्षे साधी कैद व ३,००० रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना साधी कैद अशी शिक्षा सुनावली. तसेच भादंवि कलम २८३ अंतर्गत २०० रुपये दंड व मोटार वाहन कायद्यान्वये कलम २२९ (२), १७७ व १०४/१७७ अन्वये प्रत्येकी ५०० रुपये दंड ठोठावण्यात आला आहे.

या प्रकरणातील पैरवी पोलीस अधीक्षक तुषार दोशी, अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले व शाहूपुरी पोलीस ठाण्याचे प्रभारी निरीक्षक सचिन म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी व्ही. बी. ढमाळ (पोहवा) व डी. जी. घाडगे (पो. कॉ.) यांनी केली.